Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2411IV05V12P0005

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On
CPDE Nov'2024
Issue–III(V), Volume–XII

# मराठी माध्यमाच्या इयत्ता 8 वी / अ मधील विद्यार्थ्यांना मराठी विषयामध्ये व्याकरणातील अलंकार ओळखण्यात येणा–या अडचणींचा अभ्यास आणि त्यावर उपाय

डॉ. मुग्धा प्रभाकर सांगेलकर
पल राजेन्द्र बी.एड कॉलेज
हनुमान नगर, कांदिवली पूर्व
मुंबई 400101

**सारांश** – मराठी भाषेमागील शास्त्रीय भूमिका समजावून घेण्यासाठी व्याकरणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अनुकरणाने तसेच सवयीने भाषा उत्तम प्रकारे वापरता येत असली तरी व्याकरणाच्या अभ्यासाने भाषेचा समजून उमजून उपयोग करता येतो. व्याकरणाच्या अभ्यासाने लेखनातील आणि भाषणातील चूकांचे दिग्दर्शन करता येते. व्याकरण शिकल्यांनतर चुकांची चिकित्सा करणे शक्य होते. भाषेची जडणघडण किंवा रचना समजण्याचे एक साधन म्हणून व्याकरणो अनन्य साधारण महत्त्व आहे.

व्याकरण हा वाड.मयाचा पाया आहे. योग्य अर्थज्ञान होण्यासाठी वाड.मयाच्या अभ्यांसकांना व्याकरणाच्या अभ्यासाची जरुरी आहे. एखादी नवीन भाषा शिकायची असेल तर स्वभाषेच्या व्याकरणाचा अभ्यास आवश्यक ठरतो. दुसरी भाषा जलद गतीने शिकण्यासाठी आपल्याला भाषेच्या व्याकरणाचा उपयोग होतो. तसेच व्याकरणातील अंलकार हा महत्त्वाचा घटक आहे. व्याकरणात अंलकाराल अनन्यसाधारण महत्व आहे. या अंलकाराचे विविध प्रकार आपल्याला 8,9,10 च्या इयत्तेमध्ये असतात. अर्थालंकार व शब्दालंकार असे या अंलकाराचे दोन प्रकार आहे. भाषा सुंदर बनवण्यासाठी काही अलंकारीक शब्दांचा उपयोग केला जातो. त्यालाच भाषेतील अंलकार असे म्हणतात. या अंलकारामुळे भाषेला एक वेगळे रुप प्राप्त झालेले आहे. अंलकारीक शब्दांमुळे भाषा अध्यपनापर्यंत पोहचली आहे. कोणतेही कविता बनवताता अध्या अलंकारीक शब्दांचा उपयोग केला जातो. कवितेची रचना करताना एक प्रकारचा नाद, लय येणे आवश्यक असते म्हणून काही विशिष्ट शब्दांची भरण असते म्हणून काही विशिष्टय शब्दांची भरण असणे गरजेचे असते याचीच जागा या अंलकारीक शब्दभरुन काढतात. अलंकारीत शब्दांमुळे कवितेला एक चांगल्याप्रकारची रचना करता येते, मराठी व्याकरणात या अलंकाराचा खूप महत्त्व आहे.

**Key word-** व्याकरण, भाषा, अंलकार

**मराठीच्या संदर्भात माहिती :–**

डेस्कार्टिस नावाचा एक विचारवंत होऊन गेला. तो म्हणतो '' I experience therefore I live'' याच्या म्हणणाचा हेतू हा की आपले अस्तित्वच मुळी आपण जीवनात घेत असलेल्या अनुभवांवर अवलंबून आहे. मानवाने जीवनात घेतलेले अनुभव त्याला जतन करता येऊ लागले. जतन केलेले अनुभव एका पिढीतून दुस-या पिढीला मिळू लागेल. हे अनुभव जतन करुन ठेवण्याचे प्रमुख साधन म्हणजे भाषा होय.

भाषाशक्ती ही माणसाला लाभलेली एक विशेष प्रवृत्ती भाषेच्या आधारे माणसाला विचार करता येऊ लागला. भाषेच्या आधारे माणसाला सामाजिकता साधता आली. एवढेच नव्हे तर माणसाला सुसंस्कृत करण्याचे बरेचसे श्रेय भाषेला दयावे लागेल. या चराचर सृष्टीत मानवाचे श्रेष्ठत्व भाषेतुळेच प्रस्थापित झाले . सृष्टीच्या घडामोडीत माणूस केवळ वाढत जाऊन नाहीसा झाला नाही तर जे जे भाषेच्या आधारे प्रकट करु लागला त्यातुन त्याने एका नव्या सृष्टीचा जन्म दिला. निसर्गाच्या पार्श्वभूमीवर ही नवसृष्टीला स्थिरता प्राप्त झाली व

त्यातून संस्कृतीचा उदय झाला. भाषेद्वारे लाभलेल्या सांस्कृतिक वारशाच्या आधारे नवी पिढी संस्कृति संवर्धनाचे कार्य उत्तम प्रकारे करु शकेल.

लेखन कौशल्याचा विकास हा या स्तरावरील विदयार्थ्यांसाठी महत्वाचा मुददा आहे. शुध्दलेखन हा विषय मराठी भाषेत अंतर्भुत असला तरी त्या कौशल्याचा म्हणावा तितका विकास झाल्याचे संशोधकाच्या निदर्शनास आले नाही.शुध्दलेखन म्हणजे काय ? त्याचे नियम किती? या विषयात अधिक गुंतून न पडता हे कौशलय विकसित करया बरोबरच त्याच्यातल लेखन शक्तीला चालना देऊन तिचा जर विकास साधला गेला तर त्याचा वापर लेखनासाठी होऊ शकेल.

भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ट पध्दत होय . माणुस विविध प्रकारे आवाज काढतो. त्याला आपण ध्वनी असे म्हणतो. या ध्वनींना अर्थ चिकटले जातात या ध्वनिप्रतिमांच्या माध्यमातून विशिष्ट प्रकारचे अर्थ ,सकेंत, संवेदना, भावना व्यक्त करण्याची एक पध्दत रुढ होते त्या रुढझालेल्या पध्दतीलाच भाषा असे संबोधले जाते.

भाषा म्हणजे माणसाने परस्परात विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी प्रतीकात्मक ध्वनिसमूहांचा रुढ केलेली सर्वसमंत व्यवस्था होय. भाषा म्हणजे सांकेतिक परंतु परंपरागत मौखिक प्रतिकांचा सामाजिक आंतरव्यवहारासाठी उपयोगात आणलेला आकृतिबंध होय.

मराठीचे महत्त्व :

भाषेचे जीवनव्यापी स्वरुप पाहिल्यानंतर मातृभाषेचे मायाबोली मराठीचे आपल्या जीवनातील श्रेष्ठत्त्व आपण जाणून घेतले पाहिजे. आपल्या अंतरंगाशी एकरुपझालेले साधन म्हणजे मातृभाषा । मातृभाषेने आपले जीवन अंतर्बाहय व्यापलेले असते. मातृभाषा हे व्यक्तीमत्व विकासाचे उत्तम साधन आहे. बालकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची सुरुवात त्याच्या मातृभाषेतून होते. मातृभाषा ही सहजपणे शिकली जाते हे एका मर्यादेपर्यंत खरे आहे. पण पुढे जाऊन ते सहेतूक शिकवावी लागते.बालकाच्या वैचारिक व भावनिक बैठकीचा पत्ता आपणास त्याच्या भाषेमुळे लागतो. मातृभाषा ही अनुकरणाने येते. बालकाच्या विकासाचा पाया त्याच्या मातृभाषेतूनच घातला जातो. त्याच्या ज्ञानाची व अनुभवांची व्याप्ती व परिपक्वता मातृभाषेतून होते म्हणून बालकांच्या जीवनात त्यांच्या मातृभाषेचे विलक्षण महत्व आहे.

प्राथमिक शिक्षणात विदयार्थी एकल भाषा अभ्यासात असतो ती भाषा म्हणजे त्याची मातृभाषा —मराठी । या वयात त्याला मातृभाषा सहन समजते. मातृभाषेतील सोप्या शंब्दांच्या आधारे तो सहजपणे बोलु शकतो. प्राथमिक शाळेत विदयार्थ्यांचे श्रवण भाषण हे व्यवहार मातृभाषेतून होत असतात; व्हावयास हवेत. त्यामुळे लेखन वाचनाचे कौशल्यही विदयार्थ्याला प्राप्त करुन घेण अवघड जात नाही. भाषेबरोबरच निरनिराळया विषयांतील संकल्पनांही त्याला स्पष्टपणे समजतात. हे त्याचे पायाभूत ज्ञान स्पष्ट व अचूक झाल्यास पुढील ज्ञान मिळविण्यासाठी त्याला पक्का आधार मिळतो.

थोडक्यात विचार करण्याची क्षमता ही भाषिक विकासावर अवलंबून असते विदयार्थ्यांना त्यासाठी मातृभाषेचा अभ्यास करताना शब्दसंपत्ती प्रचंड प्रमाणावर वाढविली पाहिजे, माहिती करुन घेतली पाहिजे. विविध प्रकारच्या वाक्यरचना, मातृभाषेतील बारकावे , सूक्ष्मता विदयार्थ्यांना अवगत असावयास हवी. विविध विचार ऐकून घेण्यासाठ तसेच समजून घेण्यासाठी त्याचबरोबर आपले विचार दुसऱ्याला स्पष्टपणे सांगता येण्यासाठी मातृभाषेसारखे दुसरे माध्यम नाही.

व्याकरण :—

मराठी भाषेमागील शास्त्रीय भूमिका समजावून घेण्यासाठी व्याकरणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अनुकरणाने तसेच सवयीने भाषा उत्तम प्रकारे वापरता येत असली तरी व्याकरणाच्या अभ्यासाने भाषेचा समजून उमजून उपयोग करता येतो. व्याकरणाच्या अभ्यासाने लेखनातील आणि भाषणातील चूकांचे दिग्दर्शन

करता येते. व्याकरण शिकल्यांनतर चुकांची चिकित्सा करणे शक्य होते. भाषेची जडणघडण किंवा रचना समजण्याचे एक साधन म्हणून व्याकरणो अनन्य साधारण महत्त्व आहे.

व्याकरण हा वाड.मयाचा पाया आहे. योग्य अर्थज्ञान होण्यासाठी वाड.मयाच्या अभ्यांसकांना व्याकरणाच्या अभ्यासाची जरुरी आहे. एखादी नवीन भाषा शिकायची असेल तर स्वभाषेच्या व्याकरणाचा अभ्यास आवश्यक ठरतो. दुसरी भाषा जलद गतीने शिकण्यासाठी आपल्याला भाषेच्या व्याकरणाचा उपयोग होतो.

मराठीमध्ये व्याकरणाचे स्थान / अंलकाराचे स्थान / अंगे :–

व्याकरणाचे हे सर्व घटक त्या त्या विशिष्ट इयत्तेच्या पाठयपुस्तकात समाविष्ट केले आहेत. व्याकरणासाठी स्वतंत्र्य पुस्तक ही कल्पना मागे पडली असून पाठयपुस्कतील गद्य व पद्य उतान्यासमवेत व्याकरण, वृत्ते व अंलकार तसेच शुध्दलेखन इत्यादी घटकांचा अभ्यास विदयार्थ्यांनी करावा अशी अपेक्षा आहे. शिक्षकांनी विदयार्थ्याना पाठयपुस्तकातील उतान्याबरोबर हे घटक शिकवायचे आहेत आणि त्यातील सलगता राखायची आहे.

तसेच व्याकरणातील अंलकार हा महत्त्वाचा घटक आहे. व्याकरणात अंलकाराल अनन्यसाधारण महत्व आहे. या अंलकाराचे विविध प्रकार आपल्याला 8,9,10 च्या इयत्तेमध्ये असतात. अर्थालंकार व शब्दालंकार असे या अंलकाराचे दोन प्रकार आहे. भाषा सुंदर बनवण्यासाठी काही अलंकारीक शब्दांचा उपयोग केला जातो. त्यालाच भाषेतील अंलकार असे म्हणतात. या अंलकारामुळे भाषेला एक वेगळे रुप प्राप्त झालेले आहे. अंलकारीक शब्दांमुळे भाषा अध्यपनापर्यंत पोहचली आहे. कोणतेही कविता बनवताता अध्या अलंकारीक शब्दांचा उपयोग केला जातो. कवितेची रचना करताना एक प्रकारचा नाद, लय येणे आवश्यक असते म्हणून काही विशिष्ट शब्दांची भरण असते म्हणून काही विशिष्टय शब्दांची भरण असणे गरजेचे असते याचीच जागा या अंलकारीक शब्दभरुन काढतात. अलंकारीत शब्दांमुळे कवितेला एक चांगल्याप्रकारची रचना करता येते, मराठी व्याकरणात या अलंकाराचा खूप महत्त्व आहे.

संशोधनाची गरज–

विद्यार्थ्याकडून मराठी विषयातील व्याकराणातील अलंकार ओळखताना चूका होतात.

1.उपमान, उपमेय यांची विदयार्थ्याना ओळख पटत नाही.

2. अलंकाराचा कोणता प्रकार आहे हे समजत नाही.

3.उदा. तक्ता, चार्ट, चिठ्ठया इत्यादी म्हणून हया व्याकरणातील अलंकारातल्या होणान्या चूकांचा अभ्यास संशोधकाने या संशोधनप्रकल्पामध्ये केलेला आहे. तसेच त्यासाठी उपचारात्मक अध्ययनाचा वापर हीकेला आहे.

समस्येचे शीर्षक–

मराठी माध्यमाच्या इयत्ता 8 वी / अ मधील विद्यार्थ्यांना मराठी विषयामध्ये व्याकरणातील अलंकार ओळखण्यात येणा–या अडचणींचाा अभ्यास आणि त्यावर उपाय

महत्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या –

1. मराठी माध्यमाचे विद्यार्थी – प्रस्तुत संशोधनातील मराठी माध्यमाचे विद्यार्थी हे पाल राजेंद्र मराठी हायस्कूल मधील इयत्ता आठवीचे विद्यार्थी विद्यार्थीनी आहेत.

2.व्याकरणातील चूका– विद्यार्थ्याकडून मराठी विषयातील अंलकारोच प्रकार ओळखण्यात चूका.

संशोधनाची उदिष्टे–

1. इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्याकडून अंलकाराचे प्रकार ओळखण्या संदर्भात होणान्या चूकांचा शोध घेणे.

2. इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्याकडून अंलकाराचे प्रकार ओळखताना होणा–या चूका सुधारणे.
3. इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्याकडून अंलकाराचे प्रकार ओळखताना उपमेय, उपमान साम्यसुचक शब्द या संकल्पनेच्या संदर्भात होणा–या चूकांच्या पूर्वचाचणी व उत्तर चाचणी मधील गुणकांची तुलना करणे.

संशोधनाच्या परिकल्पना–

1.दिशादर्शक परिकल्पना– इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्याकडून अंलकाराचे प्रकार ओळखण्या संदर्भात कोणत्याही चूका होत नाहीत

2.शून्य परिकल्पना– इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्याकडून अंलकाराचे प्रकार ओळखतानाउपमेय, उपमान साम्यसुचक शब्द या संकल्पनेच्या संदर्भात होणा–या चूकांच्या चूकांच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मधील गुणकांमध्ये फरक नाही.

संशोधनाच्या मर्यादा–

अ. प्रस्तुत संशोधन केवळ पाल राजेंद्र मराठी हायस्कूल कांदिवली पूर्व च्या सहावीच्या विद्यार्थ्यापूरते मर्यादित आहे.

ब. प्रस्तुत संशोधन केवळ मराठी विषयातील अलंकारातील ,उपमेय उपमान, साम्यसुचकाशब्द अलंकाराचा प्रकार ओळखा यांच्या ओळखणीच्या संदर्भात होणा–या चूकांच्या पूरते मर्यादित आहे.

क. प्रस्तुत संशोधन केवळ 36 विद्यार्थ्यापूरते मर्यादित आहे.

ड. प्रस्तुत संशोधन केवळ 2022–23 या शैक्षणिक वर्षापूरते मर्यादित आहे.

कोणतेही संशोधन करताना संबंधित साहित्याचा आढावा/ सर्वेक्षण करणे ही एक महत्वाची आणि अनिवार्य पायरी आहे. हे संबंधित संशोधनाचे संक्षिप्त आणि समिक्षात्मक मूल्यांकन सादर करते. तसेच एखादया प्रकारचे संशोधन त्या विशिष्ट क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या ज्ञानामध्ये आपले योगदान कशाप्रकारे देते याचा आढावा घेते. संबंधित साहित्याचा आढावा होणे खूप महत्वाचे आहे कारण संबंधित साहित्याचा आढावा घेतल्यानंतर संशोधन कर्त्याला मुख्य संकल्पना, संशोधन साधने,तंत्रे संशोधन पद्धती यांचे ज्ञान होण्यास मदत होते. संबंधित संशोधनामध्ये कषाप्रकारे साधने, तंत्रे पध्दती यांचा वापर केला आहे हे समजण्यास मदत होते.

संबंधित साहित्याचा आढावा घेतल्याने संशोधनासाठी आवश्यक पाश्वभूमी तयार होते. तसेच संशोधनाला संशोधन करताना आवश्यक असलेल्या ज्ञानाविषयी मार्गदर्शन करते संशोधकाने खालील साहित्याचा आढावा घेतला आहे.

संशोधकाने / संशोधिकेने खालील साहित्याचा आढावा घेतला आहे.

1. संशोधनाचे शीर्षक–मराठी माध्यमाच्या विदयार्थ्यांना श्रुत लेखन करताना येणाऱ्या येणाऱ्या समस्या आणि उपाय योजनांचा अभ्यास

   संशोधकाचे नाव–श्री राजन पाटिल

   वर्ष–2011–2012

   नमुना आणि नमुना निवड पध्दती–नमुना निवडीसाठी शाळेची पाल राजेद्र शाळेचे आणि इयत्तेची आठवी अ निवड पध्दतीने केली आहे. तसेच 25 विद्यार्थ्यांना निवड सरल यादृच्छिक पध्दतीने केलेली आहे.

   संशोधन पध्दती–प्रायोगिक पध्दती एकल गट पूर्वोत्तर परिक्षण अभिकल्प

   संशोधन साधने–प्रश्नावली

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2411IV05V12P0005
e-ISSN No. 2394-8426
Special Issue On CPDE Nov'2024
Issue–III(V), Volume–XII

उद्दिष्टे–1. इयत्ता आठवी अ च्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून श्रुतलेखनासंबंधी होणा–या चुकांचा शोध घेणे.

2. इयत्ता आठवी अ च्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून श्रुतलेखनासंबंधी होणा–या चुका सुधारणे.

3.इयत्ता आठवी अ च्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून श्रुतलेखनासंबंधी होणा–या चुकांचा पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मधील गुणांची तुलना करणे.

निष्कर्ष –

1. मराठी विषयातील विद्यार्थ्यांचा श्रुतलेखनाचा सराव कमी पडतो.
2. आरोह अवरोहयुक्त वाचन ऐकण्यात विद्यार्थी कमी पडतात.
3. वाचनात असणा–या निकषांचा विद्यार्थी कमी विचार करतो.
4. श्रुतलेखन योग्य प्रकारे न करता येणा–या विद्यार्थ्यांचा शोध घेता आला.

2. संशोधनाचे शीर्षक–इग्रंजी माध्यमाच्या विदयार्थ्यांना इग्रंजी उच्चारण्यात येणाऱ्या समस्या आणि उपाय योजनांचा अभ्यास

संशोधिकेचे नाव–श्रीमती ममता भट

वर्ष–2009–2010

नमुना आणि नमुना निवड पध्दती–नमुना निवडीसाठी शाळेची पाल राजेद्र शाळेचे आणि इयत्तेची आठवी अ निवड पध्दतीने केली आहे. तसेच 30 विद्यार्थ्यांना निवड सरल यादृच्छिक पध्दतीने केलेली आहे.

संशोधन पध्दती–प्रायोगिक पध्दती

संशोधन साधने– पूर्व पत्रिका आणि उत्तर पत्रिका

उद्दिष्टे–1. इंग्रजी बोलताना इग्रंजी माध्यमाच्या विदयार्थ्यांना उच्चारात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास.

2. अस्खलित इंग्रजी बोलणाऱ्या विदयार्थ्यांची तुलना अस्खलित इंग्रजी न बोलणाऱ्या विदयार्थी यांतील फरक दूर करणे.

निष्कर्ष –

1. विदयर्थ्यांना विराम चिन्हांची सवय लागली.
2. विदयार्थ्यांची विराम चिन्हांमध्ये सुधारणा झाली.
3. दररोज सराव केल्यामुळे विदयार्थ्या ।मध्ये विरामचिन्हातील योग्य असा फरक दिसून आला.

3 संशोधनाचे शीर्षक–इग्रंजी माध्यमाच्या विदयार्थ्यांना मराठी भाषा शुध्द लेखनात येणाऱ्या समस्या आणि उपाय योजनांचा अभ्यास

संशोधिकेचे नाव–अश्विनी धीरन सावर्डेकर

वर्ष–2009–2010

नमुना आणि नमुना निवड पध्दती–नमुना निवडीसाठी शाळेची पाल राजेद्र शाळेचे आणि इयत्तेची आठवी अ निवड पध्दतीने केली आहे. तसेच 30 विद्यार्थ्यांना निवड सरल यादृच्छिक पध्दतीने केलेली आहे.

संशोधन पध्दती–वर्णनात्मक संशोधन पध्दती

संशोधन साधने– पूर्व पत्रिका आणि उत्तर पत्रिका

उद्दिष्टे–1. इग्रंजी माध्यमाच्या विदयार्थ्याना मराठी भाषा शुध्द लेखनात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास.

2. मराठी भाषेचे शुध्द लेखन करणाऱ्या विदयार्थ्यांची तुलना.

3. मराठी भाषेचे शुध्द लेखन न करणाऱ्या विदयार्थ्यांना फरक शोधने व दूर करणे.

अर्थ.

कोणतेही शैक्षणिक संशोधन करण्यासाठी संशोधनाच्या विविध पद्धतींचा वापर केला जातो. संबधित संशोधन कोणत्या काळातील आहे आणि त्याचे स्वरूप काय आहे यावरून संशोधन पद्धतीची निवड केली जाते.

संशोधन समस्येच्या निराकारणासाठी नियोजन आणि कार्यवाही करण्यासाठी संशोधन पद्धतीचा वापर केला जातो संशोधन पद्धतीचा वापर केला जातो संशोधन साधने, माहिती संकलन आणि माहितीचे विश्लेषण यांचा समावेश होतो. संशोधन हे भूतकाळ,वर्तमान काळ किंवा भविष्यकाळ भिमूख असते.

प्रकार– संशोधनाच्या अनेक पद्धती आहेत त्यापैकी तीन प्रमूख पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

1) ऐतिहासिकसंशोधन पद्धती
2) वर्णनात्मक संशोधन पद्धती
3) प्रायोगिक पद्धती

1) ऐतिहासिक संशोधन पद्धती

ऐतिहासिक संशोधन हे भूतकालाभिमुख असते. यात भूतकाळातील घटना किंवा कृतींचा नेमका अर्थ लावता यावा, त्या मागील कारणे शोधता यावीत उपलब्ध नवीन माहितीच्या आधारे भूतकालीन घटनांतधील संबंध नव्याने उजेडात आणावेत त्यांचा नव्याने अर्थ लावता यावा यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला जातो. ऐतिहासिक संशोधनाच्या निष्कर्शाच्या आधारे वर्तमान स्थिती व समस्या यांचे यथार्थ आकलन व स्पष्टीकरण करता येते व आगामी घटना संबंधीची पुर्वानुमाने करता येतात.

प्रायोगिक संशोधनाप्रमाणे ऐतिहासिक संशोधन शोध अभ्यासाच्या कोणत्याही चलघटकांची हाताळणी करू शकत नाही किंवा त्यांचे नियंत्रण ही करू शकत नाही घडायच्या घटना घडून गेलेल्या असतात. त्या घटनांची पुनरावृत्ती करणे संषोधकाच्या हातात नसते. संशोधक तत्कालीन दस्तावेजांचा काळजीपूर्वक अभ्यास करून अवशेषांचे परीक्षण करून व त्या काळातील लोकांच्या मुलाखती घेवून त्या काळात नेमके काय घडले याचे शास्त्रीय वस्तुनिष्ठतेच्या आधारे यथार्थ चित्रण करण्याचा प्रयत्न करीत असतो

2) पृथ्थकरण/विश्लेषणसंशोधन पद्धती

या प्रकारामध्ये वर्तमान कालीन घटना तसेच सबंध घटनेतील संबध या विषयीचे अध्ययन केले जाते आणि यावरुन ही माहिती केली गेली की या गोष्टीचे वर्तमान काळात स्वरुप कसे आहेत या पध्दतीमध्ये विविध प्रकारचे अध्ययन जसे सर्वेक्षण विकास पध्दती व्यक्तीगत अध्ययन , अर्न्तवस्तु अंतर्गत जनमत अध्ययन इत्यादी अध्ययन पध्दतीचा समावेश केला जातो. तसेच यामध्ये साक्षात्कार अनुसूची प्रश्न व शेवटी वस्तु विश्लेषण इ. पध्दतीचा समावेश केला जातो.

3. प्रायोगिक संशोधनपद्धती –

कार्याकारणसंबंध दर्शविणाऱ्या गृहीतकांचे खरेखुरे परीक्षण करण्याची एकमेंव संशोधन पद्धती म्हणजे प्रायोगिक पद्धती होय. एखादी घटना अथवा लक्षण दुसऱ्या एखादया घटनेसाठी जबाबदार आहे हे व्यक्त करणारे विधान म्हणजे कार्यकारण संबंध दर्शविणारे गृहितक होय.

प्रायोगिक अभ्यासात संशोधक कमीत कमी एका स्वाधीन चलाची हाताळणी करतो, इतर संबध चलघटक नियंत्रित करतो आणि स्वाधीन चलाचा एका अथवा अनेक आश्रित चलांवर होणाऱ्या परिणांमाचे निरीक्षण करतो.

अभिकल्प—

संशोधन — अभ्यासाच्या सप्रमाणतेस प्रभावित करणारे जास्तीत जास्त बाहय चलघटक नियंत्रित करून त्यांचा प्रभाव निष्क्रिय अथवा न्युनतम करण्याची योजना म्हणजे अभिकल्प होय

प्रायोगिक संशोधनामध्ये वापरले जाणारे अभिकल्प पुढीलप्रमाणे —

1) पूर्व प्रायोगिक अभिकल्प ( Pre- Experimental )

2) विशुदध प्रायोगिकअभिकल्प ( True- Experimental )

3) प्राय प्रायोगिक अभिकल्प ( Quasi- Experimental )

संशोधनाचा हेतू संशोधनाची चले व नियत्रंण करणारे घटक यावरून संशोधन अभिकल्प निवडला जातो.

संशोधनपद्धतीची निवड —

प्रस्तूत संशोधनामध्ये संशोधन पदधतीची निवड ही प्रायोगिक अभिकल्पामधील पूर्व प्रायोगिक अभिकल्पातील एकल गट पूर्वोत्तर परिक्षण अभिकल्प किंवा विशुध्द प्रायोगिक अभिकल्प — पूर्वोत्तर परीक्षण नियंत्रित गट अभिकल्प वापरला गेला आहे

- एकल गट पूर्वोत्तर परीक्षण अभिकल्प

या अभिकल्पामध्ये प्रयोगासाठी एकच गट निवडला जातो. या गटाला पूर्व चाचणी (O 1) दिली जाते नंतर नियोजित कालावधीपर्यंत उपचाराची मात्रा (×) दिली जाते. प्रयोगाच्या शेवटी उत्तर चाचणी (O 2) दिली जाते. पूर्व आणि उत्तर चाचणीमधील गुणांच्या ( O 2- O 1) फरकावरून स्वाधीन चलाचा आश्रित चलावर होणाऱ्या परीणामाविषयी निष्कर्ष काढले जातात. या अभिकल्पाचे स्वरूप पूढीलप्रमाणे —

$O_1 \times O2$

O1— पूर्व चाचणी

×— उपचाराची मात्रा

O2— उत्तर चाचणी

- पूर्वोत्तर परीक्षण नियंत्रित गट अभिकल्प —

या अभिकल्पामध्ये प्रायोगिक गट व नियंत्रित गट यांची निवड यादृच्छिकरणाच्या आधारे केली जाते. यामध्ये दोन्ही गटांची पूर्व चाचणी घेतली जाते त्यानंतर प्रायोगिक गटाला नियोजित कालावधीपर्यंत उपचाराची मात्राा दिली जाते व नियंत्रित गटाला उपचार दिला जात नाही त्यानंतर दोन्ही गटाची उत्तर चाचणी घेतली जाते.

| प्रायोगिक गट | नियंत्रित गट |
|---|---|
| R 01×02 | 01 02 |
| R&सहभागींची यादृच्छिक पद्धतीने निवड | R& सहभागींची यादृच्छिक पद्धतीने निवड |
| 01 — पूर्व चाचणी | 01— पूर्व चाचणी |
| ×— उपचाराची मात्रा | रिक्त जागा — उपचाराची मात्रा नाही |

02– उत्तर चाचणी 02& उत्तर चाचणी नमुना/प्रतिदर्श –

प्रत्यक्ष अभ्यासासाठी जनसंख्येचे प्रतिनिधीत्व करणारा व जनसंख्येतून निवडलेला कोणताही उपसंच म्हणजे नमुना /प्रतिदर्श होय.

प्रस्तुत संशोधनामध्ये कांदिवली (पू), पाल राजेंद्र हायस्कूलच्या 36विदयार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

नमुना निवड पद्धती –

एखादया मोठया समूहातून (जनसंख्येतून) त्या समूहाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या काही व्यक्तींची (नमुना) निवड करण्याची प्रक्रिया म्हणजे नमुना निवड प्रक्रिया होय.

नमुना निवडीसाठी प्रामुख्याने पूढील दोन पद्धतीचा वापर केला जातो.

I) संभाव्यता नमुना निवड

1. सरल यादृच्छिक नमुना निवड
2. कृमबद्ध /नियमबद्ध नमुना निवड
3. स्तरीय नमुना निवड
4. गुच्छ नमुना निवड
5. बहुस्तरीय नमुना निवड

ठ) असंभाव्यता नमुना निवड

1. सप्रयोजन नमुना निवड
2. हिस्सा/निर्दिष्ठांश नमुना निवड
3. सोयीस्कर/प्रासंगिक नमुना निवड

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवडीसाठी पाल राजेंद्र मराठी शाळेमधील आणि इयत्ता सहावीची निवड सप्रयोजन नमुना निवड पद्धतीने केली आहे तसेच विदयार्थ्यांची ( 37 ) निवड सरल यादृच्छिक पद्धतीने केलेली आहे.

माहिती संकलनाची साधने

प्रस्तुतसंशोधनामध्ये संशोधकाने/संशोधिकेने माहिती संकलनासाठी स्वनिर्मित पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी प्रश्नावलीचा वापर केला आहे.

खालील प्रश्नावलीचा (परिशिष्ठ अ आणि ब) माहिती संकलनासाठी वापर केलेला आहे.

1. मराठी भाषेतील व्याकरणामधील अलंकाराविषयी पूर्व चाचणी प्रश्नावली
2. मराठीव्याकरणामधील अलंकाराविषयी .उत्तर चाचणी प्रश्नावली

साधनांचे प्रशासन

सर्व प्रथम निवडलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांशी संपर्क साधून त्यांची संशोधन समस्या आणि प्रश्नावलीच्या प्रशासनासंदर्भात (माहिती संकलन) परवानगी घेतली. त्यानंतर वर्ग शिक्षकांशी संपर्क साधून त्यांची परवानगी घेवून विदयार्थ्याकडून माहिती संकलन केले गेले. एकूण 36 विदयार्थ्यांकडून (परिशिष्ठ क) माहितीचे संकलन केले गेले.

माहिती विश्लेषण पद्धती –

महिती विश्लेषणासाठी मध्यमान या सांख्यिकी तंत्राचा वापर केलेला आहे.

पृथक्करण आणि अर्थ निर्वचन ही संशोधनामधील महत्वाची पायरी आहे. या प्रकरणामध्ये संषोधिकेने आपल्या संशोधनाच्या विषयाची संबंधित साहित्याची माहिती संशोधन साधनाच्या आधारे जमा केल्यानंतर त्या माहितीचे पृथक्करण/विश्लेषण करुन त्यावरुन अर्थनिर्वचन केले जाते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधिकेने विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी, उत्तर चाचणीमधील गुणांची योग्य सांख्यिकी तंत्राचा वापर करुन विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केलेले आहे.

उद्दिष्ट 1 इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून अंलकार वाचन करताना येणा–या अडचणींचा शोध घेणे.

परिकल्पना:

1. शून्य परिकल्पना– इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून अंलकाराचे प्रकार ओळखताना लेखनासंदर्भात कोणत्याही चूका होत नाही.

सारणी 4.1

| अनु क्र. | परिक्षण | एकूण विद्यार्थी संख्या | मध्यमान |
|---|---|---|---|
| 1 | पूर्व चाचणी | 36 | 17.97 |

अर्थनिर्वचन–वरील सारणी क्र.4.1मधील माहितीवरुन असे दिसून येते की,सशोधनासाठी निवडलेले एकूण विद्यार्थी 36 असून त्यांनी पूर्व चाचणीमध्ये मिळविलेल्या गुणाचे मध्यमान 17.97 आहे. यावरुन असे दिसून येते की इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून अंलकाराचे प्रकार ओळखताना चुका केल्या जातात. म्हणून दिशादर्शक परिकल्पना '' इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून अंलकाराचे प्रकार ओळखण्या सबधी चूका होत नाहीत.'' अस्वीकृत केली जाते. वरील सारणीतील माहितीचे सादरीकरण आलेख क्र.4.1 मध्ये केलेले आहे.

सारणी 4.2

विद्यार्थ्यांच्या उत्तर चाचणीतील गुणांचे मध्यमान

| अनु क्र. | परिक्षण | एकूण विद्यार्थी संख्या | मध्यमान |
|---|---|---|---|
| 1 | उत्तर पूर्वचाचणी | 36 | 25.80 |

उदिष्ट –इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून मराठीविषयातील अंलकाराचे प्रकार ओळखताना यांसबंधीत होणा–या चूकांच्या पूर्वचाचणी व उत्तर चाचणी मधील गुणकांची तुलना करणे.

परिकल्पना 2–इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून अंलकाराचे प्रकार ओळखताना यांसबंध 45 होणा–या चूकांच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मधील गुणकांमध्ये फरक नाही.

सारणी 4.3


| अनु क्र. | परिक्षण | एकूण विद्यार्थी संख्या | डमंद | ड2.ड1 |
|---|---|---|---|---|
| 1 | पूर्व चाचणी | 36 | 17.97 | ड2.ड1 |
| 2 | उत्तर पूर्वचाचणी | 36 | 25.80 | 7.83 |

अर्थनिर्वचन–वरील सारणी क्र.4.3मधील माहितीवरुन असे दिसून येते की,इयत्ता आठवी मराठी माध्यमातील विद्यार्थ्याचे पूर्व चाचणीतील गुणाचे मध्यमान 17.97 आहे उत्तर चाचणीतील गुणाचे मध्यमान 25.80 आहे. म्हणजेच इतर चाचणीतील गुणांचे मध्यमान हे पूर्व चाचणीतील गुणांच्या मध्यमानापेक्षा 7.83 ने अधिक आहे म्हणून परिकल्पना '' इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून व्याकरणातील अंलकारासंबंधी होणा–या चुकांचा पूर्वचाचणी व उत्तर चाचणीमधील गुणांमध्ये फरक नाही''.अस्विकृत केली जाते.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2411IV05V12P0005

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On
CPDE Nov'2024
Issue–III(V), Volume–XII

वरील सारणीतील माहितीचे सादरीकरण आलेख क्र.4.31 मध्ये केलेले आहे. आलेख 4.3 विद्यार्थ्यांच्या पूर्व आणि उत्तर चाचणीतील गुणांच्या मध्यमानातील फरकाचे आलेखाव्दारे सादरीकरण——




| | |
|---|---|
| पूर्व चाचणी | उत्तर चाचणी |

भाशा शक्ती ही माणसाला लाभलेली एक विशेष प्रवृत्ती होय. भाषेमुळे विचार जागृत होतात. तसेच भाषेच्या माध्यमातून भावना उदिद्पित होतात. भावना विकास साधला जातो. भाषेमुळे माणूस सुसंस्कृत व रसिक बनतो.

भाषेचे तत्वज्ञान म्हणजे व्याकरण होय. परस्पर संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे व्याकरण म्हणून भाषेचा शास्त्रशुध्द अभ्यास करण्यासाठी व्याकरणची गरज असते. व्याकरणांबरोबर विद्यार्थ्यांनी जो अलंकारातील फरक ओळखणे तो लिहणे योग्य करणे हे देखिल महत्वाचे आहे.

5.2 संशोधनाची उदिष्टे–

1 इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून व्याकरणातील अंलकाराची ओळख लेखन होणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

5.3 संशोधनाच्या परिकल्पना–

1.शून्य परिकल्पना–इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून अंलकाराची ओळखी संदर्भात कोणत्याही चूका होत नाही.

उदिद्ष्ट क्र.1 आणि दिशादर्शक परिकल्पना क्र. 1 अनुसार

सारणी क्र.4.1मधील माहितीवरुन असे दिसून येते की,विदयार्थ्यांना पूर्व चाचणी मध्ये मिळविलेले गुणांचे मध्यमान17.97 आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की इयत्ता मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून अलंकार लेखनासदर्भात चुका केल्या जातात. म्हणून संशोधिकेव्दारा उपचारात्मक अध्यापन केले गेले.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2411IV05V12P0005
e-ISSN No. 2394-8426
Special Issue On CPDE Nov'2024
Issue–III(V), Volume–XII

उद्‌दिष्ट क्र 3 आणि शून्य परिकल्पना क्र. 2 अनुसार

सारणी क्र.4.3 मध्ये विद्यार्थ्यांच्या पूर्व व उत्तर चाचणीतील गुणांची तुलना केली गेली आहे. विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणीतील गुणांचे मध्यमान 17.97 आहे आणि उत्तर चाचणीतील गुणाचे मध्यमान 25.80 आहे. पूर्व आणि उत्तर चाचणीतील गुणांच्या मध्यमानांमध्ये 7.83 इतका फरक आहे.

सामान्य

1.इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्याकडून अलंकारामध्ये ओळखीच्या संदर्भात चूका केल्या जात होत्या. या चूका पूर्व चाचणीव्दारे शोधून काढल्यानंतर त्या सुधारण्यासाठी उपचारात्मक अध्यापन दिले असता त्या चुकांचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून आले उपचारानंतर उत्तर चाचणीतील गुणामध्ये धनात्मक बदल झालेला दिसून आला. सूचना–

विद्यार्थ्यासाठी सूचना–

1. विद्यार्थ्यानी वर्गामध्ये शिक्षक शिकवित असताना शिक्षकाकडून लेखनाविशयी माहिती जाणून घेणे आवष्यक आहे.
2. अलंकार शिकताना आवडीने शिकणे.
3. अलंकार ओळखताना उपमेय, उपमान, साम्यसूचक शब्द याची ओळख करताना शिक्षकांची मदत घेणे

शिक्षकांसाठी सूचना–

1. मराठीच्या शिक्षकाने भाषा या विशयात अलंकार या विषयात किती महत्वाचे आहे हे सविस्तर समजून सांगणे.
2. शिक्षकांनी अलंकार शिकविताना उपमेय व उपमान ,साम्यसूचक शब्द साधारणधर्म याची माहिती करुन देणे.
3. विदयार्थ्यांच्या अडचणी समस्यांचा शोध घऊन त्या पध्दतीने सहनुभूतीपूर्वक त्याच्या समस्या निराकरण करावे.
4. शिक्षकाने अलंकाराचे अध्यापन करताना विदयार्थ्यांवर तणार येणार नाही अध्यायन पध्दतीचे अध्यापन करणे.
5. अलंकाराची माहिती देताना संबंधित योग्य उदाहरणे विदयार्थ्यांना दयावीत.

पुढील संषोधनासाठी सूचना–

1. हे संशोधन पूर्ण महाराष्टामध्ये करु शकता येते.
2. प्रस्तूत संशोधन हे इतर माध्यमाच्या विद्यार्थी देखील करु शकतात.
3. प्रस्तूत सषोधन C.B.S.C., I.C.S.C शाळांमध्ये देखील करता येईल.
4. प्रस्तूत संशोधन व्याकरणातील अव्यय,समास,यावरही करता येईल.

## संदर्भ सूची

1. मराठी व्याकरण – मोरा वाळंबे
2. मराठी व्याकरण – सुरेश कळंबिकर
3. मराठी व्याकरण – म.भ. कुंडले